## L. A. BILL No. XLV OF 2023.

A BILL

TO REPEAL THE MAHARASHTRA CASINOS (CONTROL AND TAX) ACT, 1976.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४५.

**महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) अधिनियम, १९७६ याचे निरसन करण्यासाठी विधेयक.**

१९७६ चा महा. ३१.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) अधिनियम, १९७६ याचे निरसन करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौ-याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) (निरसन) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ याचे निरसन.

**२.** महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) अधिनियम, १९७६ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९७६ चा महा. ३१.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यातील कॅसिनोंचे नियंत्रण व नियमन करण्यासाठी आणि कॅसिनोंमधील जुगारावर कर बसविण्यासाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) अधिनियम, १९७६ (१९७६ चा महा. ३१) अधिनियमित करण्यात आला आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम १ च्या पोट-कलम (३) मध्ये, अशी तरतूद केली आहे की, उक्त अधिनियम, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकापासून अंमलात येईल. तथापि, कॅसिनोला महाराष्ट्र राज्यात परवानगी देऊ नये असे शासनाचे मत असल्याने, आजपर्यंत उक्त अधिनियम अंमलात आणला नाही. उक्त अधिनियम कायद्याच्या संहितेमध्ये आहे त्यामुळे, उक्त अधिनियम निरसित करणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२३.

**देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४५.]**

**[महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) अधिनियम,**
**१९७६ याचे निरसन करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर